# आदित्यदीप

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१

**दीपावली विशेषांक**



ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१ (दीपावली) शके १९४३

"आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।।"



# आदित्यदीप



कार्यकारी संपादक
सौ. अपर्णा अभ्यंकर

(आदित्य प्रतिष्ठानचे वार्तापत्र)

संस्थापक-संपादक
गुरुदेव शंकर अभ्यंकर

वर्ष : १२

**दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!**

अंक : ४

## अंतरंग

संपादकीय – नीती, धर्म आणि राजकारण – सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर ३
बहुतांची अंतरे – ५
गो देवता अष्टक – ९
दीपावली महोत्सव – १०
हे पाठ कराच! – सुभाषिते १४
संतभारती क्षणचित्रे १५
पृष्ठदान आवाहन १८
श्रीरामांनी भरताला राजनीतीचा केलेला उपदेश
- गुरुदेव रचित 'शङ्कर रामायणा'तून १९
जाग – आदित्यव्रती नीलेश जालनावाला २२

प्रकाशक, मुद्रक, मालक : **सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर** (कार्यकारी विश्वस्त - आदित्य प्रतिष्ठान)
४/१५, वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२
संपादक : **सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर** यांनी हे त्रैमासिक
४/१५, वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२ येथून प्रसिद्ध केले.
सहसंपादिका : **सौ. रश्मी अरुण तुळजापूरकर, सौ. सुलभा श्रीकांत आठवले** * मुखपृष्ठ फोटो : **अरुंधती अभ्यंकर**
REGISTERED : RNI No. MAHMAR / 2010 / 31595

### संपादकीय

# नीती, धर्म आणि राजकारण



– सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर

सस्नेह नमस्कार,

व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजस्वातंत्र्य याचा अतिरेक न होऊ देता देशामध्ये धर्माधिष्ठित, सुखकारक आयुष्य जगता आले तर देशामध्ये नीती-न्याय आहे असे म्हणता येईल. परंतु आत्ता जगामध्ये ज्या प्रकारची युद्धे, झगडे, पैशाच्या जोरावर मुस्कटदाबी, विज्ञानाचा अतिरेक, मोबाईलमधील हिडीस गोष्टी पाहून बालमनावर होणारा परिणाम, त्यामुळे होणारे अत्याचार, विकृत प्रचार माध्यमे हे पाहिल्यावर वाटते की नीतिमत्ता म्हणता येईल असे कुठे, काय शिल्लक आहे? आणि भविष्यात काय पाहावे लागणार आहे? अशी भीती मनात दाटते आणि सणाच्या दिवशी गोड घास उचललेला हात तेथेच थबकतो. दीपावली सण समोर दिसत असताना तुमच्या मनात येईल की हे असे संपादकीय कशासाठी? पण सर्व सण यासाठीच आहेत की त्या विशिष्ट दिनी चांगल्याने वाईटावर मात केली आहे आणि आताची सामाजिक ढासळलेली नीतिमत्ता पाहता आपण सर्वांनी अधिक जागरूक असायला पाहिजे. तरच आणि तरच आपल्या पुढच्या पिढ्या सुरक्षित राहतील. संस्कारित राहतील.

विशेषत: भारतात धर्म हीच नीती मानली गेली. कारण धर्म म्हणजे सदाचार, धर्म म्हणजे चार ऋणे अंशत: अनृण करणे, धर्म म्हणजे धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांना शिरोधार्य करणे! परस्त्री मातेसमान आणि परधन मातीसमान मानायला आमचा हिंदू धर्म शिकवितो. कर्तव्य, जबाबदारी, बंधन, बांधिलकी, त्याग, न्याय, समता, निष्ठा, देशप्रेम, मैत्री, करुणा या सर्व नैतिक संकल्पना म्हणजेच धर्म आचरणे. याचे भान समाजाला देणे, त्याचे चिंतन करणे, ज्ञान विकसित करणे हे सर्व हा धर्म प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी अत्यावश्यक आहे. तरच तो विकसित समाज बनतो. नीती म्हणजे सन्मार्गाने घेऊन जाणारी नियमावली होय. ती त्रिकालाबाधित राहावी म्हणून त्याला अधिष्ठान धर्माचे आणि उदाहरणेसुद्धा धर्माचीच! मानवाचे कल्याण व त्यासाठीची कर्तव्ये म्हणजे नीतिशास्त्र हे जगातील तत्त्वचिंतकांनी, तत्त्ववेत्त्यांनी मान्य केले आहे. कोणती कृती केली असता लोक आपणास सज्जन म्हणतील म्हणजेच चांगल्या जीवनाचे स्वरूप कसे असते हे नीतिशास्त्र स्पष्ट करते. मग ही चांगली परंपरा बनते. ‘मी माझ्या इच्छेला येईल तसे वागेन’ असे समाजात राहून कोणी म्हणूच शकणार नाही. नीतिमत्तेच्या चौकटीत राहूनच त्याला वेशभूषा, केशभूषा, आचार, व्यवहार हे सर्व आचरावे लागेल. तर समाज सुबद्ध राहील.

हिंदू धर्म इतका प्राचीन, व्यापक व सर्वसमावेशक आहे की तो विश्वधर्म व्हावा. आमचे पूर्वज इतके हुशार व चिंतनशील की त्यांनी मानवाच्या आचरणाला धर्माचे अधिष्ठान दिले. तेच नीतिशास्त्र बनले.

उदाहरणार्थ स्वर्ग, सुख वा मोक्ष-मुक्ती हे जीवनाचे उद्दिष्ट असेल तर मानवाने साधकाचे साधे जीवन अंगिकारावे. तेच चांगले व आदर्श जीवन होय. **वैयक्तिक जीवन आणि समाजात वावरतानाचे जीवन यात संवाद, समतोल आणि सुसूत्रता हवी.** दोन्हीकडे स्वातंत्र्य असावे, पण स्वैराचार नसावा. तसे झाले तर अनवस्थाच ओढवेल.

या सर्वच संदर्भात राजकारण हे पवित्र असले तर खूपच गोष्टी सुसूत्र राहतात. कारण महाभारत सांगते की राजकारण म्हणजे हत्तीचे पाऊल आहे. या पावलामध्ये इतर सर्व प्राण्यांची पावले मावतात. इतका जनमानसावर राजकारणाचा पगडा असतो. मग ती राजेशाही असो की लोकशाही. सध्या आधुनिक काळात नीतीचे आचरण केले जावे अशी क्षेत्रे पहा आणि प्रसंग पहा– दयामरण, फाशी, गर्भपात, कामसंबंध, विवाह, हुंडा, भ्रूणहत्या अशी वैयक्तिक आणि युद्ध, माहिती तंत्रज्ञान, संगणक, धरणाचे महाप्रकल्प, कामगार संघटना, ध्वनी वा वायू प्रदूषण, नद्यांचे प्रदूषण, आण्विक प्रकल्प, वकिली, डॉक्टरी, पोलीस, लष्करी, सनदी सेवा, शिक्षण, आत्ता आलेली कोरोना महामारी आणि मुख्य म्हणजे राजकारण या सर्वच क्षेत्रांमध्ये नीती आचरली जाते का? राष्ट्र घडविणे ही सेवा आहे का धंदा? इतका अनाचार का? अर्थात हे प्रश्न शुद्ध चारित्र्य, सदसद्‌विवेकबुद्धी, आत्मबुद्धी यामुळेच सोडवता येतील. तत्त्ववेत्ते जाणतात की नीतिमत्ता खालावल्यामुळेच हे प्रश्न निर्माण झाले आहेत. धर्माचे अधिष्ठान विसरल्यामुळे स्वैराचार माजला आहे.

गुरुदेव अभ्यंकर सांगतात त्याप्रमाणे राजकारण वेगळे आणि राष्ट्रकारण वेगळे. राजकारण वैयक्तिक महत्त्वाकांक्षेतून खेळले जाते आणि राष्ट्रकारण समाजाचे हित व्हावे म्हणून केले जाते. जसे आदरणीय पंतप्रधान भारत देश उन्नत व्हावा, राष्ट्र बलवान व्हावे म्हणून अखंड कार्यरत आहेत.

**महाराष्ट्रातील राजकारण –** छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात इतके गलिच्छ राजकारण खेळले जावे यासारखे दुर्दैव नाही. लोकशाहीला धुडकावून सत्ता व पैसा याकडेच बघून निष्ठा पायतळी तुडवून जो प्रकार चालला आहे तो पाहून माझे मन उद्विग्न होते. तुमचेही होत असणार. म्हणून तर कधी नव्हे इतकी सद्विचार नवीन पिढीवर बिंबवण्याची गरज निर्माण झाली आहे. असे सद्विचार पसरवण्याचे केंद्र व्हावे यासाठी आदित्य प्रतिष्ठान वैश्विक संत विद्यापीठाची निर्मिती करत आहे. गंमत पहा, दारूचा गुत्ता काढायला पैसाच लागतो आणि संत विद्यापीठ निर्माण करायलाही पैसाच लागतो. ‘अर्थ एव प्रधान:’ असे कौटिल्य यासाठीच म्हणतो. तेव्हा सर्वांनी या संतपीठाच्या सत्कार्यास आर्थिक साहाय्य करावे ही कळकळीची विनंती.

आपला दिवाळी अंक असे सद्विचार घेऊनच आला आहे. यात दिवाळी का साजरी करायची हे दिले आहेच, पण श्रीरामांनी भरताला राजनीतीचा केलेला उपदेश अत्यंत चिंतनीय आहे. गुरुदेवांनी ‘शङ्कर रामायण’ लिहित असताना या उपदेशावर रचलेल्या ओव्या केवळ अमोलिक आहेत. त्या याच अंकातील पृ. १९ ते २१ वर अवश्य वाचा. इतरांनाही वाचायला द्या. यूट्यूबवरील श्रीविष्णुसहस्रनाम आणि श्रीसूक्त पठणाला लक्षावधी भक्तांनी, भगिनींनी दिलेल्या प्रतिसादासाठी हार्दिक धन्यवाद!

असा सद्विचारांचा दीप उजळवत साजरी करूया दीपावली. दीपावलीच्या मागे आपण शुभ हे विशेषण लावतो. त्यातच नीती, सदाचार सामावले आहेत!

*‘शुभ दीपावली’*

* * *

# बहुतांची अंतरे

***(कोरोनाच्या अत्यंत कठीण कालखंडात गुरुदेवांची यूट्यूबवरील विविध विषयांवरील प्रवचने लक्षावधी श्रोत्यांनी पाहिली, ऐकली. या प्रवचनांना लाभलेल्या प्रचंड प्रतिसादातील ही काही मोजकी हृद्गते! – संपादिका)***

नमस्कार,

मी सौ. प्रीती महाजन राहणार बडोदा.

खूप दिवसांपासून आपणास हा माझा अनुभव लिहून पाठवावा असे मनात होते. पण असे अनेक मेसेज, फोन आपल्याला येत असतील तेव्हा असा अजून त्रास द्यावा की नाही म्हणून साशंक होते. तरी आज आपल्याला तसदी देत आहे त्याबद्दल क्षमस्व!

एप्रिलच्या मध्यात मी व माझे यजमान कोव्हिड पॉझिटीव्ह झालो आणि मन भीतीने धास्तावले. घरात दोन लहान मुली. सगळं कसं निभावेल ही काळजी. पण परमेश्वराची कृपा आणि योग्य औषधोपचार यामुळे त्या भयंकर दिव्यातून बाहेर पडलो. यात मानसिक आरोग्याची काळजी घ्यायला मदत झाली ती गुरुदेव शंकर अभ्यंकरजी यांच्या प्रवचनांची! झोपून होते तेव्हा आणि अजूनही रोज रात्री झोपण्यापूर्वी मी यूट्यूबवर उपलब्ध असलेली त्यांची प्रवचने ऐकते ज्यामुळे मानसिक शांती लाभते. त्यांची ओघवती, अभ्यासपूर्ण, मधुर आणि नादमय भाषाशैली अतिशय परिणामकारक आहे. तसेच आपण म्हटलेले रामरक्षाकवचही आम्ही रोज ऐकतो. आम्हाला आमच्या कठीण काळात आपली ही जी मोलाची मदत झाली त्याबद्दल आपणा उभयतांचे खूप आभार आणि आपणास नमस्कार! हे शब्दात पूर्णपणे व्यक्त करणे माझ्यासाठी कठीण आहे तरी मी माझ्या भावना मेसेजद्वारे थोडक्या शब्दात आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतेय.

परमेश्वर आपल्या सर्वांचे स्वास्थ्य उत्तम ठेवो आणि आपले हे कार्य असेच चालू राहो ही सदिच्छा आणि प्रार्थना!

धन्यवाद!

**– सौ. प्रीती महाजन,** बडोदा

झांशीची राणी लक्ष्मीबाई हिची आज (ज्येष्ठ शुद्ध सप्तमी) पुण्यतिथी. त्या निमित्ताने गुरुदेवांनी केलेली तीनही प्रवचने ऐकून आजच पूर्ण केली. अतिशय रोमहर्षक आणि अंगावर काटा आणणारी झांशीची राणीची तडफदार कारकीर्द कशी होती ती एवढ्या वर्षानंतरसुद्धा गुरुदेवांच्या अगाध आणि अमोल वाणीने जागृत झाली. भा. रा. तांब्यांनी लिहिलेल्या अतिशय सुरेख अशा शब्दांची पकड, खूप काही शिकवून गेली. इतिहास उलगडून दाखवण्याची गुरुदेवांची पद्धत खूप आवडली. झांशीच्या राणीला त्रिवार वंदन! आणि गुरुदेवांना सादर प्रणिपात!

**– अनुपमा कोठावळे**

आदरणीय गुरुदेव, सौ. अपर्णाताई अभ्यंकर

सादर प्रणाम,

'संतांचा हा संग लिहवी अभंग'

संतांची संगती लिहवी अभंग. एक तरी ओवी

अनुभवावी. एक तरी अभंग अनुसरावा, एक तरी श्लोक समजून घ्यावा या संकल्पनेप्रमाणे एक तरी प्रवचन आचरणात आणावे म्हणता म्हणता 'कोठे जावे काय करावे आरंभिली बोहरी' अशी अवस्था झाली. परंतु तुमचे सर्व कल्याणकारी प्रवचन, अभयकारी प्रवचन श्रवणीय झाले. 'दयेसी नाही सरी'– आपल्या देशाला लाभलेले संत आणि त्यांचे प्रवचन प्रतिकूल परिस्थितीमध्ये लाभलेले वरदान आहेत. दु:ख अशा प्रकारे वाट्याला यावे की त्यातून फक्त आणि फक्त भगवंताचे नामसंकीर्तन घडावे. प्रश्न असे पडावे की त्याचे उत्तर तुमच्या प्रवचनातून मिळावे. आपली उंची इतकी आहे की आम्हाला अभिमान वाटावा. तुमचे प्रवचन ऐकताना माझे चित्त आपोआपच मनन चिंतन करताना स्वत:मधेच नवचैतन्य निर्माण होते. अंतर्मुख होऊन स्वयम् प्रेरणेने आत्मनिर्भर होण्याची एक नवीन ऊर्मी जागृत झाली ती आदिशंकराचार्यांच्या वरील प्रवचनातून प्रत्ययास आली. चित्त, चिंतन, चेतना जागृत होत आहे हे पण जाणवलं. तुमच्या वैखरीची प्रखरताच अशी आहे की रोमारोमातील स्पंदन जागृत झाली. सर्वांगाचे कान होऊन ॐकारात स्थिरावणारी प्रवचने म्हणजे सर्व नवविधाभक्ती एकत्र येऊन मानस पूजा सुफल संपूर्ण झाली. गुरुदेवांच्या प्रवचनासारखा दुसरा सत्संग नाही. प्रवचन नसून आम्हाला लाभलेली पावन भिक्षाच आहे. अभेदभक्ती, आत्मनिवेदन, सज्जनसंगती, अलिप्तपण, अनन्यसेवा लाभली. अंती स्वत:च्याही पलीकडे काय आहे ते पहायची विलक्षण प्रेरणा नित्य अनुभवास येते. दररोज विष्णुसहस्रनाम पठणाने दिवसाला सुरुवात होते. दासबोधाचे वाचन समर्थांची चौपदी म्हणून झाल्यावर. दिवभरातील काम आवरून रामरक्षा म्हणायचं. भगवद्गीतेचा पाठ करून, या सगळ्याचे चिंतन मनन म्हणजे कोहम्पासून ते सोहम् पर्यंतची अनुभूती. सर्वच प्रवचनं कामधेनू कल्पवृक्ष आहेत. किमान पाच वाक्यांची तरी शब्द सुमनांजली अर्पण करता यावी यात खंड पडू नये. हीच ईश्वर चरणी प्रार्थना आहे.

**– हेमलता रामचंद्र जाधव,** कोल्हापूर

माननीय आदित्य प्रतिष्ठान यांस

"आम्ही काय कुणाचे खातो, देतो राम आम्हाला देतो" महान कवी वाल्मीकि यांनी रामायणासारखा ग्रंथ रचून चरित्र कथन करून भारतीय जनतेला महान देणे देऊन ठेवले आहे. त्याचा प्रभाव आज हजारो वर्षे तसाच गुंजारव करीत आहे. आणि अनेक शिष्योत्तम अवतरत आहेत. आधुनिक काळात किंवा या कलियुगातही वंदनीय ग.दि.मा. आणि बाबुजी यांनी तर सामवेदातून गायन करून त्याचा गुंजारव त्रिखंडात दुमदुमत ठेवला आहे.

अशावेळी वंदनीय शंकर अभ्यंकर यांनी पुन्हा नव्याने त्यांच्या शैलीतून 'शङ्कर रामायण' काव्य निर्मिती करावयास घेतली असून त्यासाठी फक्त एका पानाचे / पृष्ठाचे रु. १०००/- दान मागितले आहे. मला हे दान म्हणताना माझीच लाज वाटते. त्या रामासाठी आम्ही पामरांनी दान केले म्हणून आत्मसन्मान करून आपला मोठेपणा मिरवायचा या इतकी लाजिरवाणी दुसरी कोणतीही गोष्ट नसेल.

**मी असे म्हणेन ही अमोल संधी आम्हाला सद्गुरूंनी देऊन एक पान तरी श्रीराम चरित्र लिहिण्यासाठी श्रीरामानेच दिलेल्या धनाचा उपयोग**

**करावयास मिळाला म्हणून मी त्यांची ऋणी आहे.** त्यांनी अशीच ग्रंथनिर्मिती करून श्रीरामानेच दिलेल्या धनातील काही धन सत्कार्यासाठी देण्याची सद्बुद्धी द्यावी हीच प्रार्थना.

**– सौ. शोभना वसंत केळकर**

Dear Aparnatai,

Honestly speaking, I should've written to you several weeks ago but at the time I was so overwhelmed that I found myself in tears of joy; I was not collected enough to pen down my thoughts.

Your **Vishnusahasranam** series has come at such an opportune time, its my perfect **'Garbhasanskar'** lessons! Yes, indeed. Lessons to imprint on my soul and my little baby girl's too.

We both have been listening to the series right from the beginning and I have also subscribed to the channel for more soul lessons. Right from pre-conception, I have listened to your voice on Vishnusahasranam during Adhik Mahina last year, praying genuinely, and here I am, blessed with a beautiful bundle of joy. **Baby Aarya** has been listening to your voice even when she was a tiny poppy seed. Each day, as I carried her in my womb to work, I would turn on Vishnusahasranam, exactly 20 minutes of calmness and soul soothing on my drive to work! She then became so familiar to your voice that she responds the same way to two other stotras, **Argala and Mahalaxmi stotra.** These three stotras have become our 'music time' together, to and fro from work all 9 months. It is unbelievable, the power of chants and the power of a familiar voice, and gifts of strong faith and prayers! The familiar voice must be guiding the soul in that mysterious realm in which tiny babies exist.

But back to the Vishnusahasranam series; I wanted to tell you that I am eternally grateful for making and sharing it. It is simple to understand, especially for someone who has limited capacity to comprehend Sanskrit but can read it, somewhat! When I heard it the first time, it felt like you're right next to me, a friendly and calm voice, simple words just reaching your mind and soul.

I am so glad that you made this series, it gave me a sense of finding something so valuable, like a treasure, as though a silent quest was over. It is truly a great effort and like me there must be so many people that are eternally grateful to you. Now, I know that even if years go by, even decades, that simple script you have developed is there to fall back on! For people like us who are away from home but still culturally very connected in their hearts, it is gift. No more difficulty in sourcing tapes, cds, thick books that are perhaps out of our capacity, to satiate that constant urge of learning lessons to guide the soul within.

I know that you're working so hard on this series but I cannot help but request

you for ones on Atharvashirsha and Ramraksha. For us and generations to come! I have no doubts that it will be valuable for anyone who listens and when you listen I know that it would plant a seed of inquisitiveness in the young minds. Someday they too will reap soul gold from it!

Thank you Aparnatai!

With warm regards and namaskar to you and Sir.

**- Vineeta, Aarya and Sameer,**
**(Australia)**

श्री. गुरुदेव,

सादर प्रणाम,

यू ट्यूबच्या माध्यमातून आपण इंदोरला सादर केलेल्या श्रीमद् भागवताचा सप्ताह नुकताच साजरा केला. माझ्या नित्य नैमित्तिकांमध्ये 'एकनाथी भागवता'चे वाचन असल्यामुळे आपले प्रवचन म्हणजे माझ्यासाठी एक पर्वणीच होती. धन्योऽहं!

दसरा किंवा दिवाळीनंतर ग्रंथराज दासबोधावरील प्रवचनमाला ऐकण्याचा मानस आहे.

आपल्या संतपीठाच्या उभारणीत अल्पसे योगदान देऊ इच्छितो. कृपया चेकचा स्वीकार व्हावा.

**– श्री. रमेश एरंडे,** पुणे

## नीलकंठा भालचंद्रा

नीलकंठा भालचंद्रा
येई रुद्रा शांभवा
दग्ध या होती दिशा
करुणाजलाने शांतवा
भ्रष्ट झाले राजवाडे
येथ पापांचे पवाडे
शोषितांची शुष्क हाडे
प्राण त्यातून फुंकवा
दाम येथे देव झाला
न्याय हरला तिमिर भरला
क्रूरतेचा कहर झाला
शंख डमरु नादवा
कसब कसबी राक्षसांचे
भस्म व्हावे दुष्टतेचे
नृत्य करुनी तांडवाचे
अभय या अवनीस द्या
वीष प्राशुन वाईटाचे
तीर्थ शिंपा जान्हवीचे
सत्य सुंदर मंगलाचे
जग नव्याने जागवा

**– वृन्दा भांबुरे,** पुणे

***(या प्रतिक्रिया प्रातिनिधिक स्वरूपात दिल्या आहेत. अशा असंख्य प्रतिक्रिया प्रतिष्ठानकडे आल्या आहेत.***
**– संपादिका)**

# गो देवता अष्टक

## (वसुबारसेनिमित्त)

(वृत्त- भुजंगप्रयात)

सडे शिंपिता अंगणी गोमयाचे ।
वरी रेखिता दिव्य गोपद्म साचे ।।
जिच्या पाउले सौख्य लाभे घराला ।
नमस्कार त्या दिव्य गो देवतेला ।।१।।

जिच्या गोमयाने धरा सारवावी ।
घराची कळा अंगणालाच ठावी ।।
करी पुष्ट जी शेतकीच्या मृदेला ।
नमस्कार त्या दिव्य गो देवतेला ।।२।।

जिचा स्नेह पान्हावला रे म्हणोनि ।
मुदे चाखितो हे दही दूध लोणी ।।
सवे पोषिते लेकरा-वासराला ।
नमस्कार त्या दिव्य गो देवतेला ।।३।।

हवी अग्निला आहुती गोघृताची ।
हवी पाककर्मा शुभा गोमयाची ।।
सवे तोषवी अग्नि-वैश्वानराला ।
नमस्कार त्या दिव्य गो देवतेला ।।४।।

खरे नत्र 'गोमुत्र' तारी मृदेला ।
करी दूर व्याधी अशा औषधीला ।।
जिच्या प्राशिता देहही शुद्ध झाला ।
नमस्कार त्या दिव्य गो देवतेला ।।५।।



स्वये रक्षिली भार्गवे कामधेनू ।
तया गोकुळीची कथा काय वाणू ।।
जिने दाविली लाघवी कृष्णलीला ।
नमस्कार त्या दिव्य गो देवतेला ।।६।।

जिला गांजिता दंडिण्या ते कसाई ।
करारी शिवाजी करी खड्ग घेई ।।
प्रतीपाळने भूप प्रख्यात केला ।
नमस्कार त्या दिव्य गो देवतेला ।।७।।

नसे गाय ही माय या भारताची ।
करा रे त्वरा शीघ्र गो रक्षणाची ।।
यदर्थी सुटे धाक गोहिंसकाला ।
नमस्कार त्या दिव्य गो देवतेला ।।८।।

(वृत्त- शार्दूलविक्रीडित)

गोमाता शुभदा अखंड वरदा
जी कामदा भाग्यदा ।
सांगाती अवधूत दत्त असती
मार्गी जियेच्या सदा ।।
वाग्पुष्पी महिमा तिच्या युवदनी
गोग्रास हा अर्पिला ।
गोपद्मी परि **दत्तदास** अलिवत्
मौनावला भाळला ।।९।।

* * *



# दीपावली महोत्सव



***'दीपस्य प्रकाशः न केवलं***
***भवनं गृहम् उज्ज्वालयतु जीवनमपि ।'***

**दरवर्षी आबालवृद्धांना आनंद देणाऱ्या या विशेष सणाविषयी विशेष माहिती.**

हिंदूंचे अनेक सण आहेत. त्यापैकी दीपावली इतका पवित्र व आनंदकारक दुसरा कोणताही सण नाही. राव-रंक सगळे या सणात सहभागी होतात. या सणात स्त्रिया, पुरुष व बालके या सर्वांस आनंद होत असतो, परस्परांकडे जाण्यायेण्याची व उपहाराची रूढी असल्यामुळे समाजात प्रेमभाव वृद्धिंगत होऊन मैत्री वाढते. कितीही आपत्ती आली तरी ती विसरण्याचा प्रयत्न या सणांच्या निमित्ताने आपण करतो. अशी ही मंगलदायी दिवाळी इतकी महत्त्वाची का? तर सलग ५-६ दिवस वेगवेगळे दिनविशेष एकत्र आल्याने हा नुसता उत्सव न राहता महोत्सव बनला आणि हजारो वर्षे हा दीपोत्सव संपन्न होऊ लागला. त्यानिमित्ताने अनेक समारंभ होऊ लागले. शाळांना सुट्ट्या, पगारात बोनस, गावाला जाणे ही उत्सवाची साखळीच निर्माण झाली. काय आहेत हे दिनविशेष ते जाणून घेऊया.

दिवाळीचे चार दिवस असे आपण म्हणतो. ते कोणते? आणि त्याआधीचे दिवस कोणते हे जाणून घेऊया.

आश्विन वद्य त्रयोदशीपासून कार्तिक शुक्ल द्वितीयेपर्यंत जो महोत्सव संपूर्ण हिंदुस्थानात आणि आता जगात मोठ्या थाटाने साजरा केला जातो तो दीपावली किंवा दिवाळी या नावाने प्रसिद्ध आहे. यातील दिवसांची नावे निरनिराळी असून प्रत्येक दिवशी धार्मिक विधी करण्यात येतात.

**वसुबारस –** चार दिवसांमधे गणला गेला नाही तरी खरे तर हा महोत्सव वसुबारस म्हणजे **गोवत्स द्वादशी**पासून सुरू होतो. या दिवशी संध्याकाळी सवत्स गायीचे पूजन करून तिला उडीद वगैरे धान्याचे वडे भक्षणार्थ द्यावे. देव, ब्राह्मण, गायी, घोडे, ज्येष्ठ, श्रेष्ठ, कनिष्ठ या सर्वांना माता आदिकरून सर्व स्त्रियांनी दिवे ओवाळावे, असे सांगितले आहे. ते शक्य नसल्यास सवत्स गायीच्या प्रतिमेचे पूजन अवश्यमेव करावे. पूजन करताना पुढील श्लोक म्हणावा.

क्षीरोदार्णवसंभूते सुरासुर नमस्कृते ।
सर्वदेवमये मातृगृहाणार्घ्य नमोस्तुते ।

'क्षीरसागरातून जन्मलेल्या सुर-असुरांना वंदनीय ठरलेल्या, जिच्या शरीरात सर्व देवता आहेत, त्या हे माते, आमच्या पूजनाचं अर्घ्य घे. तुला आमचा नमस्कार.'

**धनत्रयोदशी –** मग येते **धनत्रयोदशी.** उत्तर भारतात याला धनतेरस असे म्हणतात. या दिवशी यमराजाला प्रसन्न करण्यासाठी, अपमृत्यू टाळण्यासाठी दक्षिणेकडे तोंड करून उंच जागी तेलाचे दिवे लावावेत. घरातील सोने-नाणे, अलंकार स्वच्छ करून पूजन करावे. देवांना धने-गूळ असा नैवेद्य दाखवावा आणि परमेश्वराला प्रार्थना करावी.

मृत्युना पाशदण्डाभ्याम् कालेन श्यामया सह।
त्रयोदश्यां दीपदानात् सूर्यजः प्रीयतां मम ।।
(स्कंदपुराण)

या दिवसाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आयुर्वेदाचे प्रवर्तक धन्वन्तरी यांची जयन्ती. या विष्णुस्वरूप धन्वन्तरीचेही अवश्य पूजन करावे.

**धन्वंतरी –** देवांचा वैद्य आणि विष्णूचा एक अवतार. समुद्रमंथनाच्या वेळी जी चौदा रत्ने समुद्रातून बाहेर आली, त्यात धन्वंतरीचा समावेश आहे. धन्वंतरी हा वैद्यराज असून, त्याच्या हातातील कमंडलू अमृताने भरलेला असतो, असे म्हटले आहे. याच्याच अलौकिक प्रतिभेने नाना औषधींचे सार अमृताच्या रूपाने देवांना प्राप्त झाले आणि ते जरा-मृत्युरहित बनले.

भागवत पुराणात विष्णूच्या चोवीस अवतारांत धन्वंतरीचा समावेश केलेला आहे. याच्यासाठी ईशान्य दिशेकडे मुख करून सायंप्रार्थना करावी. धन्वंतरी हा आयुर्वेदाचा प्रवर्तक मानला जातो.

धन्वंतरी मंत्र –

ॐ नमो भगवते महासुदर्शनाय
वासुदेवाय धन्वंतराये: ।
अमृतकलशहस्ताय सर्वभयविनाशाय
सर्व रोगनिवारणाय ।
त्रिलोकपथाय त्रिलोकनाथाय श्री महाविष्णुस्वरूप
श्री धन्वंतरी स्वरूप श्री श्री श्री औषधचक्र
नारायणाय नम: ।।

**नरक चतुर्दशी –** आता दिवाळीचा आनंदाचा व अभ्यंगस्नानाचा दिवस **नरकचतुर्दशी.** दीपावलीचा पहिला दिवस नरकचतुर्दशी या नावाने प्रसिद्ध आहे. भागवतात अशी कथा आहे की, पूर्वकाली भौमासूर किंवा नरकासूर नावाचा एक बलाढ्य असुर प्राग्ज्योतिषपूर येथे राज्य करीत होता. देव व मानव यांस तो पीडा देऊ लागला. आपण अजिंक्य व्हावे म्हणून त्याने आपल्या राजधानीच्या सभोवती पर्वतांचे व शस्त्रांचे कोट रचले. हा दुष्ट दैत्य स्त्रियांस पीडा देऊ लागला. त्याने जिंकून आणलेल्या सोळा सहस्र उपवर राजकन्यांना आपल्या तुरुंगात कोंडून ठेवले. श्रीकृष्णाला ही बातमी समजताच त्याने बरोबर सत्यभामेस घेऊन त्या असुराच्या दुर्गावर हल्ला केला. नरकासुरास ठार करून सर्व राजकन्यांची मुक्तता केली. या युद्धाचे स्मारक म्हणून नरकचतुर्दशीचा दिवस दिवाळीतील मुख्य दिवस म्हणून साजरा करतात. आपण विष्णुसहस्रनामात विष्णूला 'रणप्रिय:' असे का म्हणतो ते यावरून ध्यानात आले असेल.

या दिवशी श्रीकृष्णाला नमन करावे–

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकी परमानंदं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ।।

नरकासुराला मारले म्हणून नरक चतुर्दशी. मरताना नरकासुराने वर मागितला की आजच्या तिथीला मंगल स्नान करणाऱ्याला नरकाची पीडा होऊ नये. म्हणून त्या दिवशी तेल-उटणी लावून पहाटे सूर्योदयापूर्वी मंगल स्नान करावे. तेला-तुपाचे दिवे लावावेत. आकाश कंदिल व पणत्यांच्या प्रकाशामुळे वातावरणातील वाईट शक्ती नष्ट होतात. दीपांच्या साहाय्याने हा आसुरी शक्तींचा संहारच होतो. थोडक्यात मंगलाच्या साहाय्याने जनसामान्य-सुद्धा अमंगलाचा नाश करतात.

**लक्ष्मीपूजन –** दिवाळीच्या कार्तिक कृष्ण अमावस्येला, दुसऱ्या दिवशी लक्ष्मीपूजन करण्यात येते. यासंबंधाने अशी कथा आहे की, पूर्वकाळी बलिराजा मोठा वैभवशाली होऊन त्याने आपल्या संपत्तीच्या व पराक्रमाच्या योगाने देवादिकांसही कारागृहात कोंडून ठेवले. त्या वेळी श्रीविष्णूने वामनाचे रूप धारण करून त्रिपाद भूमिदान मागण्याच्या मिषाने सर्व विश्वावर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. सर्वांबरोबर लक्ष्मीचीही सुटका

झाली. लक्ष्मीची याप्रमाणे असुरांच्या हातातून मुक्तता झाल्याबद्दल सर्वांस आनंद झाला व तिचे वास्तव्य प्रत्येकाच्या घरात कायमचे असावे एतदर्थ तिची भक्तिपूर्वक पूजा करण्याचा प्रघात या दिवसापासून प्रचारात आला. अमावास्येस लक्ष्मीपूजन करण्यात येते. व्यापारी लक्ष्मीपूजनोत्सवास फार मान देतात. शहरात फटाक्यांचा दणदणाट सर्वत्र कानी येत असतो. **या दिवशी श्रीसूक्ताचे पठण अवश्य करावे.**

लक्ष्मीपूजनाचे दिवशी लक्ष्मीची पूजा पुढील मंत्र म्हणून करावी.

नमस्ते सर्वदेवानां वरदासि हरेः प्रिया ।
या गतिस्त्वत्प्रपन्नानां सा मे स्यात्तव दर्शनात् ।

'हे लक्ष्मी, तू सर्व देवांना वर देणारी व विष्णूला प्रिय आहेस. तुला शरण येणाऱ्यांना जी गती प्राप्त होते, ती मला तुझ्या दर्शनाने प्राप्त होवो.'

कुबेराचेही पूजन पुढील मंत्र म्हणून करावे.

धनदाय नमस्तुभ्यं निधिपद्माधिपाय च ।
भवन्तु त्वत्प्रसादेन धनधान्यादिसम्पदः ॥

'निधी व पद्म यांचा अधिपती असलेल्या कुबेरा, तुला नमस्कार असो. तुझ्या कृपेने मला धनधान्यादी संपत्ती प्राप्त होवो.'

**बलिप्रतिपदा वा पाडवा –** यानंतरचा तिसरा दिवस म्हणजे **बलिप्रतिपदा.** अर्थात पाडवा. कार्तिक शुद्ध प्रतिपदा. बलीचे दमन झाले, स्त्रिया मुक्त झाल्या म्हणून हा पाडवा साजरा होतो. सकाळी अभ्यंगस्नान होते, स्त्रिया पतीला ओवाळतात, दुपारी पक्वान्न भोजन, नवीन वस्त्र-दागिने भेट देऊन दिवस आनंदाने व्यतीत करतात.

तसेच या दिवसाचे आणखी एक फार महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भगवान श्रीराम रावणाचा वध करून लंकेवर विजय प्राप्त करून या दिवशी अयोध्येला परत आले. वामन, राम आणि कृष्ण या अवतारांच्या आयुष्यातील महत्वाच्या घटना या तीन दिवसात घडल्या आहेत. श्रीराम जन्मोत्सवाची सुरुवात चैत्र महिन्यातील गुढी पाडव्याला (चैत्र शुक्ल प्रतिपदा) होते, तर दिवाळीतील पाडव्याला (कार्तिक शुक्ल प्रतिपदा) श्रीरामांचे अयोध्येत आगमन!

याच दिवशी मध्य व उत्तर भारतात नवीन विक्रम संवत्सर सुरू होतो. (इसवीसनात ५८ मिळविले की या संवत्सराचा अनुक्रमांक मिळतो.) महाराष्ट्रात विशेष करून या दिवशी स्त्रिया पतीला ओवाळतात. औक्षण करतात. पती पत्नीला ओवाळणी घालतो. याच दिवशी नवदाम्पत्याचा दिवाळसण साजरा होतो. उत्तर भारतात या दिवशी गोवर्धन पूजा केली जाते.

दिवाळी पाडवा हा साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त आहे. आर्थिक हिशोबाच्या दृष्टीने व्यापारी नववर्षाचा हा प्रारंभ मानतात.

**यमद्वितीया किंवा भाऊबीज –** कार्तिक शुद्ध द्वितीया हा चौथा दिवस यमद्वितीया या नावाने प्रसिद्ध आहे. यालाच भैयादूज अथवा भ्रातृद्वितीया असे म्हणतात. या दिवशी मृत्युदेव जो यम त्याने आपली बहीण यमी हिच्या घरी जाऊन तिला वस्त्रालंकार वगैरे दिले व तिच्या गृही मोठ्या आनंदाने भोजन केले, अशी पुराणांतरी कथा आहे. हा दिवस बंधुभगिनींच्या भेटीचा असून भगिनींकडून बंधूची पूजा होत असल्यामुळे या सणाला 'भाऊबीज' असे नाव मिळाले आहे.

या दिवशी बहीण भावाच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना करते. हा दिवस व्रजामधे मोठ्या प्रमाणात संपन्न होतो. यमुना नदीत स्नान करण्यासाठी दुरून दुरून लाखो श्रद्धेय भाऊबहीण मथुरेमधे येतात. विश्राम घाटावर हा सण संपन्न करतात. या दिवसी सकाळी चंद्रदर्शन घेण्याची

परंपरा आहे. असे म्हणतात की सख्खी बहीण नसली तरी कोणत्याही बहिणीच्या हातचे जेवेल त्याला आयुष्य, धर्म, अर्थ, सुख यांची प्राप्ती होते. भावाबहिणीचे नाते जपण्याचा धर्माने किती छान उपाय सांगितला!

असा हा अत्यंत आनंदाचा सण आपण याही वर्षी संपन्न करणार आहोत.

आपण आपल्या घरी आनंदाने सण संपन्न करत असतो पण आपले आदरणीय पंतप्रधान मोदीजी देशाच्या सीमेवर रक्षण करणाऱ्या जवानांसमवेत दिवाळी साजरी करतात. कारण त्यांच्या शौर्यामुळे आपण सुरक्षित आहोत. कुमाऊ प्रदेशात या उत्सवाला 'बगवाली' असे म्हणतात. हा केवळ दीपोत्सव नसून येणाऱ्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी सैन्याची जमवाजमव करतात. आपले पंतप्रधानही असे जागरूक आहेत. तेव्हा त्यांना व सैनिकांना वंदन करूया. शुभ दीपावली!




**तुलसीविवाह** – दीपावली संपन्न झाली की लगेच तुलसी विवाहाचे वेध लागतात. तोपर्यंत दीपावलीचेच वातावरण असते.

प्रत्येक वर्षी कार्तिक शुद्ध द्वादशीस तुळशीचा विवाह केला जातो. पद्मपुराणात यासंबंधाची कथा अशी आहे की, पूर्वकाली जालंधर नावाचा एक महाप्रतापी व असाधारण योद्धा होऊन गेला. त्याने देवांस पादाक्रांत करून आपल्या दैत्यांस सुखी केले. त्याची वृंदा नावाची स्त्री महापतिव्रता होती. पुढे जालंधर बलहीन होत्साता संग्रामात पतन पावला. त्यानंतर लगेच वृंदेने अग्नीची चिता रचून तीत प्रवेश केला. स्मशानभूमीत तिच्या रक्षेवर पार्वतीने तुलसी, आवळा व मालती यांचे बी पेरून तीन झाडे उत्पन्न केली. त्यातील तुलसी ही सर्वगुणसंपन्न वृंदेप्रमाणे आहे असे मानून विष्णूस ती फार प्रिय झाली. पुढे वृंदा ही रुक्मिणीच्या रूपाने अवतरून विष्णूचा अवतार जो श्रीकृष्ण, त्यास तिने कार्तिक शुद्ध द्वादशीच्या दिवशी वरिले. हा रुक्मिणी-कृष्ण विवाह दरवर्षी सर्व हिंदू साजरा करतात.

**शास्त्रोक्त विधी व रूढी** – या दिवशी सर्व हिंदू लोकात तुलसीविवाहविधी करण्याची चाल आहे. तुलसीवृंदावन सारवून ते सुशोभित करतात व त्यात ऊस पुरून, आवळे व ओली चिंच टाकतात. वृंदावनाभोवती ऊस रचून सुशोभित मंडप तयार केला जातो. प्रहर रात्रीच्या आत पूजा आटोपल्यावर मंडपाभोवती आरती, दीपाराधना, मंगलाष्टके म्हणण्यात येऊन जमलेल्या मंडळीस लाह्या, कुरमुरे, ऊसाच्या गंडेऱ्या वगैरे देण्यात येतात. सौभाग्यवती स्त्रिया या दिवशी प्रेमभावाने तुलसीस आरती दाखवितात. चातुर्मासात हिंदू लोक विवाहकार्ये करीत नाहीत. तुलसी विवाहापासून चातुर्मासारंभापर्यंत शुभ मुहूर्तावर ती होत असतात.

असा हा दीपोत्सव तुलसी विवाहाबरोबर सर्व मंगल कामना, इच्छा संपन्न करणारा होवो आणि कोरोनामुक्त जग पहावयास मिळो, हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!

* * *

## शस्त्र-शास्त्र पूजन



**दसऱ्याच्या दिवशी प्रतिष्ठानच्या कार्यालयात**
**शस्त्राबरोबर शास्त्राची (ग्रंथांची) पूजा संपन्न झाली.**

## हे पाठ कराच!

**साधूनां दर्शनं पुण्यं तीर्थभूता हि साधवः ।**
**तीर्थं फलति कालेन सद्यः साधुसमागमः ।।**

‘साधुसंतांचे दर्शन घेणे हेच पुण्यकर्म आहे कारण ते लोक तीर्थासारखेच असतात. तीर्थाचे फळ मिळायला वेळ लागतो, पण साधुसंतांच्या सहवासाचे फळ तत्काळ मिळते.’

**उद्यमस्साहसं धैर्य बुद्धिः शक्तिः पराक्रमः ।**
**षडेते यत्र वर्तन्ते तत्र देवः सहायकृत् ।।**

‘उद्योग, धाडस, धीरता, हुशारी, शक्ती आणि पराक्रम हे सहा गुण ज्याच्याजवळ असतील त्याला देव मदत करतो.’

# संत विद्यापीठ क्षणचित्रे



नवरात्रात संत विद्यापीठ भूमीवर
कार्यालयात देवीची पूजा



रस्त्याची डागडुजी



बहरलेला निसर्ग

# श्रीमहाविष्णू मंदिराची पायाभरणी





४०,००० चौरस फुटांचे विशाल अधिष्ठान





**संतभारतीतील मंदिर व प्रदर्शन, अन्नपूर्णागृह याच्या फाऊंडेशनचे काम वेगाने सुरू आहे. सत्कार्यास मदत करण्यासाठी खालील बँक खात्यावर दिवाळीच्या सुमुहूर्तावर आपली देणगी अवश्य पाठवावी.**

**HDFC BANK,** Hingane Bk. Branch, Sinhagad Road, Pune-51

**A/c Name : Aditya Pratishthan, A/c No. 0825 111 000 0016**, IFSC : HDFC 0000825

# संत विद्यापीठ क्षणचित्रे




भक्ती ज्ञानाच्या मंदिरासाठी विज्ञानाची जोड





# पृष्ठदान आवाहन



वाल्मीकि रामायण अरण्यकाण्डावरील ओवीबद्ध काव्यात्मक टीकाग्रंथ 'शङ्कर रामायण' (तिसरा खण्ड) आता सिद्ध झाला असून लवकरच प्रकाशित होत आहे. या काव्याचे वैशिष्ट्य म्हणजे गुरुदेवांनी वाल्मीकि रामायणावरील प्रत्येक श्लोकावर हे टीकाभाष्य लिहिले आहे. यापूर्वी बालकाण्ड आणि अयोध्याकाण्ड हे ग्रंथ वाचकांनी वाचले आहेत. त्यांची पारायणे केली आहेत. त्यातून मिळणारी सात्त्विक प्रेरणा अनुभवली आहे.

अरण्यकाण्डात आपण अनुभवणार आहोत श्रीरामांनी केलेला दीर्घ १० वर्षांचा प्रवास, राक्षसांशी दिलेला अभूतपूर्व यशस्वी लढा, श्रीरामांना लाभलेले ऋषीमुनींचे आशीर्वादपर मार्गदर्शन, रावणाने केलेले सीतेचे अपहरण आणि जटायूची रावणाशी आमरणान्त झुंज! अपहरण प्रसंगातील सीतेची धीरोदात्तता, श्रीरामांचा शोक, सीताशोधासाठी श्रीराम व लक्ष्मण यांची सिद्धता अशा अनेक घटनांच्या दृष्टीने अत्यंत मोठ्या कालखण्डाचे हे अरण्यकाण्ड आहे.

तसेच या काण्डापर्यंत श्रीरामांची वनवासातील चौदापैकी तेरा वर्षे व्यतीत झाली. त्यातील प्रत्येक दिवसाचा संशोधनपर तपशील गुरुदेवांनी प्रस्तावनेत दिला आहे. ही प्रस्तावनाही वाचनीय, अभ्यसनीय आहे.

गुरुदेवांच्या अभूतपूर्व काव्यसामर्थ्याने हा इतिहास मनावर कोरला जातो. इतिहासातील प्रसंगातील तत्त्वज्ञान गुरुदेव सुलभ करून सांगतात. आपण या काव्यरूपी इतिहासात रमतो आणि आपले अंतरंग समृद्ध होते.

बालकाण्ड आणि अयोध्याकाण्डानंतर आता प्रकाशित होत आहे अरण्यकाण्ड. सर्गामधील विषयसूची, अवघड शब्दांचे अर्थ, माहितीपूर्ण परिशिष्टे, ७६५८ ओव्या असलेला, रंगीत छायाचित्रांनी नटलेला आणि ६२० पृष्ठांचा हा ग्रंथ ज्ञानेश्वरी-दासबोधासारखा संग्रही असावा असाच आहे.

या ग्रंथासाठी १०००/- रुपयांचे पृष्ठदान देणाऱ्यास हा ग्रंथ भेट मिळेल आणि या ग्रंथात त्यांचे नाव सानंद छापले जाईल. आपण पृष्ठदान देऊन या 'श्रीरामकार्यात' सहभागी व्हावे ही प्रार्थना.

आपण आधीच्या दोन खण्डांना असे भरभरून योगदान दिले आहेच. तसेच या खण्डाला द्याल असा विश्वास आहे. या आवाहनाबरोबर प्रतिष्ठानचा बँक खाते नंबर कळवत आहोत. पृष्ठदान केल्याचे कृपया मोबाईल 8484921130 या प्रतिष्ठानच्या नंबरवर कळवावे आणि नाव व पत्ता याच नंबरवर कळवावा. मनःपूर्वक धन्यवाद!

**संपर्क**
आदित्य प्रतिष्ठान,
१५ वेदान्तनगरी सोसायटी,
स. नं. ४, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२
दूरभाष : 020-25445171
मोबाईल : 8484921130

**HDFC BANK**
Hingane Bk. Branch,
Sinhagad Road, Pune-51
**Aditya Pratishthan**
**A/c No. 0825 111 000 0016**
IFSC : HDFC 0000825

## श्रीरामांनी भरताला राजनीतीचा केलेला उपदेश

### 'शङ्कर रामायणा'तील सुवचने

***'स्वराष्ट्रासाठी सञ्जीवन । व्हावे सुगंधित चंदन ।***
***झिजावे गा नित्यनूतन । चरित्र होऊन ।।***
***हाच घ्या महाकाव्यबोध । श्रीरामकथेचा प्रबोध ।***
***त्याग, पराक्रम नि युद्ध । राष्ट्ररक्षणा ।।'***

**शङ्कर रामायणा**च्या 'अयोध्याकाण्डा'त श्रीरामकथेतील **'राष्ट्र सर्वोपरी'** ही शिकवण गुरुदेवांनी अप्रतिमपणे शब्दबद्ध केली आहे. आपल्या देशात आज राजकीय पक्षांच्या राजकारणात सर्वजण **राष्ट्रकारण** या शब्दाची ओळख विसरून गेले आहेत. राजकारण इतक्या हीन पातळीवर खेळले जाते की गीतेत वर्णिलेली दैवी संपत्ती लयाला गेली आहे असे वाटते. आजचे राजकारण अर्थकेन्द्री झाले आहे. मानवी जीवन गरीब बिचारे आणि सोशीक झाले तर संपत्ती अति महत्त्वपूर्ण झाली आहे. मानवी मूल्यांची किंमत शून्य होऊन सदाचार, नीती, देशप्रेम, सामाजिक बांधिलकी हे सर्व दुर्लक्षित आहे. धर्माचरण विस्मृतीत गेले आहे तर अधर्म गौरवाने मिरवत आहे. अशा विपरीत परिस्थितीत श्रीरामांनी भरताला चित्रकूटावर केलेला उपदेश आणि विचार आदर्श राज्यकारभाराचा वस्तुपाठच आहे. गुरुदेवांनी अयोध्याकाण्डात (सर्ग १००) हा उपदेश अतिशय परिणामकारक, अर्थपूर्ण अशा ओव्यांमध्ये शब्दबद्ध केला आहे. ओवीरूप उपदेशातील निवडक ओव्या वाचकांसाठी सादर केल्या आहेत.

**राज्य चालवणारे मंत्री कसे असावेत हे सांगताना ते म्हणतात–**

'रहस्य ज्ञाते गुप्त शब्द। जयांचे हृदयी नि:शब्द। निष्काम, सत्कर्मी प्रबुद्ध। ते मन्त्री।।९७।। जे कृतज्ञ नि प्रज्ञावंत। स्थिर बुद्धीत प्रतिष्ठित। निश्चल आत्मनिग्रहात। ते मन्त्री।।९८।। निषिद्ध कर्म अति हीन। लाजते ज्यामुळे सुमन। इंद्रियनिग्रह सुवचन। ते मन्त्री।।९९।। स्वभावत: अति सरळ। परि नच भोळे, चञ्चल। न्यायान्यायाप्रति निश्चळ। ते मन्त्री।।१००।।

**नसे हीन गा अभिलाषा। जयांची मर्यादेची भाषा। ना भय, क्रोध, लोभ, पिपाशा। ते मन्त्री।।१०५।।**

नसे थोरपणाचा डौल। कारण श्रेष्ठ कुल शील। सोशिक, मनी आत्मबल। ते मन्त्री।।१०७।। जन्मजात स्वकुलिनता। बांधवांची इष्ट युक्तता। आत्मनिग्रहाची दृढता। ते मन्त्री।।१०८।। नसे धनाचा ज्यांसी स्वार्थ। मनी जागता परमार्थ। राष्ट्रधर्म योजिती अर्थ। ते मन्त्री।।१०९।। न्यायाधिष्ठित अभ्युदय। निष्कलङ्क नित ऐश्वर्य। राजधर्मे देती अभय। ते मन्त्री।।११०।। चालती वेदोक्त सन्मार्ग। थोर आचरती सुवर्ग। जीवन जणु यज्ञसर्ग। ते मन्त्री।।१११।। धैर्यासह क्षमाशीलता। तेजासह शुचिर्भूतता। नीतिसह सुसंस्कारता। ते मन्त्री।।११२।। बोलती यथार्थ भाषण। परचित्ताचे जे चित्तज्ञ। राष्ट्रकारणा परिपूर्ण। ते मन्त्री।।११३।। चतुर आखती धोरण। करिताती राष्ट्रकारण। कालपरिस्थिती जाणून। ते मन्त्री।।११४।। राष्ट्राचे नित हितासाठी। स्वामीकार्याचे पूर्तीसाठी। तत्परता

सदा दाविती। ते मन्त्री।।११५।। जाणती नीतिज्ञ प्रबुद्ध। नेमका असे काय भेद। विशुद्ध आणिक निषिद्ध। ते मन्त्री।।११६।।

राष्ट्राचा अवाढव्य व्याप। सांभाळिती जे आपोआप। न येता जराही की कोप। ते मन्त्री।।१२९।। मन्त्री बाहु, मन्त्री श्रवण। मन्त्रीच समर्थ नयन। मन्त्र्यांविना सर्व विहीन। राजपाट।।१३०।।

शीलवान जे सदाचारी। षडाङ्गाचे जे अधिकारी। नीतिप्राविण्य उपकारी। ते मन्त्री।।१५३।।'

**केन्द्रीय मंत्री आजच्या भारतात कसे असावे? श्रीरामांनी अमात्यांचे (सचिव) गुणवर्णन केले आहे. याप्रमाणे आपले वर्तन ठेवणारे राजकारणी मातृभूमीचे आदर्श सेवक ठरतील, हे वाचन करताना पदोपदी जाणवते. गुरुदेव सांगतात–**

'असती चाञ्चल्य रहित। निर्मत्सरी नि स्वामीभक्त। क्लेशसहिष्णु वर्तनात। ते अमात्य।।७८५।। स्वधैर्यासह नित्य बल। शुद्ध, स्वच्छ कुशल शील। अजातशत्रु जे सकल। ते अमात्य।।७८६।। अङ्गी समयसूचकता। सङ्कटी असे निर्भयता। मूर्त चारित्र्यसंपन्नता। ते अमात्य।।७८७।। दाक्षिण्य आणि कुलिनता। सत्त्वस्थ दैवसंपन्नता। विशाल बुद्धी, व्यापकता। ते अमात्य।।७८८।। शक्यसामन्तता, दृढता। सुदर्शिता, सूक्ष्मलक्षता। विनयशील धार्मिकता। ते अमात्य।।७८९।। ज्यांचे अभिगामिक गुण। वर्तन चारित्र्यसंपन्न। नीती, धृति-शास्त्रचिंतन। ते अमात्य।।७९०।। परराष्ट्रात कुशलता। स्वस्थैर्यासाठी सहिष्णुता। वाक्चतुरता, सत्यवादिता। ते अमात्य।।७९१।। दुस्तर आपत्तिकालात। राहती पूर्ण स्वामीनिष्ठ। अविचल जयांचे चित्त। ते अमात्य।।७९२।। शांत, दांत आणि विनित। सत्कुलीन नि शुभान्वित। शास्त्रार्थ तत्त्व ज्यांसी ज्ञात। ते अमात्य।।७९३।। भरता तुजसी साङ्गेन। अमात्य म्हणजे रे कोण। ज्याकारणे राष्ट्रकारण। सुखरूप।।७९४।। 'अमा' म्हणजे गा जवळ। नृपपदी निष्ठा निश्चळ। कल्याणा वर्तने अचळ। ते अमात्य।।७९५।।

**आपल्या देशाचा कारभार करणारा पंतप्रधान कसा असावा याचे प्रतिबिंब श्रीरामांनी कथन केलेल्या राजधर्मात पुरेपूर दिसते. गुरुदेवांच्या राजधर्मावरील ओव्या एका आदर्श राज्याचा, देशाचा प्रमुख कसा असावा याचे अप्रतिम सुंदर दर्शन घडवतात–**

'उपभोगशून्य जो स्वामी। आचारे शुद्ध नि निष्कामी। विश्वकल्याणाचे या धामी। साक्षात् विष्णु।।२२२।। मित्रांची करावी पारख। भोवती असले अनेक। विमर्श विचार विवेक। असावा मनी।।२२९।।

विवेकाधिष्ठित जीवन। ज्याचे, तोचि श्रेष्ठ राजन। व्हावे की तयाने पावन। राजधर्माने।।२६१।। विनयाने दुष्कीर्तिनाश। विक्रमे सङ्कटविनाश। विनाश करी क्रोधाभास। क्षमावृत्ती।।२६२।। जयाचे विशुद्ध चरित्र। विनयशील जो वरिष्ठ। असे कुलिनांहुन श्रेष्ठ। शंभरशा।।२६४।। राष्ट्राचे स्वास्थ्य रे भरता। क्षात्रधर्मातचि प्रवर्ता। अत: दण्डनीतीच्या हाता। जपावे नीट।।२६६।। होता दण्डनीति दुबळी। त्रयींचा लोप हो अकाळी। म्हणुनि राहावे सबळी। नृपाने त्या।।२६७।।

नसता राजाचा अङ्कुश। मानव करती विनाश। स्वजनांसह होय नाश। अवघ्यांचा।।२८२।। नसता गोपाल रक्षण। पशु खातात की गोधन। तैसेचि

नसता राजन। दुर्दशा जनांची॥२८३॥ म्हण 'बळी तो कानपिळी'। वर्ततील ऐसी सगळी। होईल पहा मग होळी। दुबळ्या जनांची॥२८४॥ संपतील घरे नि दारे। उद्ध्वस्त होतील निवारे। आश्रया पाहतील सारे। कोणाकडे?॥२८५॥ बहु गलबला होईल। मालकीच नच राहील। जङ्गम वित्त लुटतील। चोर सारे॥२८६॥ ना बंधु भगिनी, न माता। ना पत्नी, ना भ्राता-पिता। नसेल जर देशी शास्ता। कल्लोळ सारा॥२८७॥ याकारणे बंधो वाहने। वस्त्रे अथवा प्रावरणे। रत्ने अलङ्कार दागिने। लुटतील सारे॥२८८॥

नरेश समर्थ असता। प्रजाजन रक्षणकर्ता। प्रजाजनानुग्रहकरता। मङ्गलकारी॥२९६॥ भूमीचे होतसे कल्याण। संतुष्ट सदा प्रजाजन। सुखी वर्षेल समाधान। सौख्यकारी॥२९७॥ धन्य होतसे इहलोक। कृतकृत्य तो परलोक। आनंदे तुष्टती अनेक। भूमिवरी॥२९८॥ राजा जाण श्रेष्ठ देवता। अवघ्यांसी हो माता, पिता। राजा सुहृद, मित्र, भ्राता। प्रजाजनांचा॥२९९॥

जे अमङ्गल, अपवित्र। दण्डितसे त्या दुष्टाप्रत। होऊनिया जो गा संतप्त। मूर्त यम॥३०४॥ धर्मद्वेष्टे जे दुष्ट जन। तयांचे करि नियमन। उग्र दण्डा स्वये देऊन। नियंता यम॥३०५॥

सुराष्ट्राचे जे सप्तधन। राजाने रक्षावे जाणून। त्याकारणे होय राजन। महाबळी॥३३७॥ 'अमात्य', 'धन' आणि 'कोश'। 'दण्डसत्ता', 'मित्र' विशेष। राजधानीसह 'स्वप्रदेश'। सातवा 'स्वयम्'॥३३८॥ या सप्तांचे हे अधिष्ठान। केलेचि पाहिजे जतन। नृप असावा की मर्मज्ञ। सातांचा या॥३३९॥

कोण कोणाचे बा कारण। सदैव करावे चिंतन। राजा हाच कालकारण। नि:संदेहपणे॥३४८॥

**आपल्या देशातील न्यायव्यवस्था कशी असावी हे गुरुदेवांनी अत्यंत परखड शब्दांत व्यक्त केले आहे—**

भरता, राजाप्रती श्रेष्ठ। पाहिजे रे वसती नित्य। ती बा उत्तम दण्डनीत। साङ्गेन तुज॥३४५॥ स्वधर्मामाजी सदा रत। अधर्मापासून निवृत्त। करिती जन कर्मे विहित। दण्डनीतीने॥३४६॥ दण्डनीतिचा विनियोग। प्रजाजना लाभे अभय। संतुष्ट होताती क्षत्रिय। आचरणे या॥३४७॥

दण्डनीति हीच मर्यादा। उत्कर्ष साधण्यासी आर्या। जैसी आर्यासी सती भार्या। हितकारी॥३६७॥ दण्डनीति हीच सुमाता। दण्डनीति हाच हो पिता। दण्डनीतिसम रे भ्राता। दुजा नाही॥३६८॥ म्हणोनि आचरावी नीती। परिणामी लाभे सत्कीर्ती। प्रजारक्षण, धर्मप्राप्ती। सहजपणे॥३६९॥

**श्रीरामांनी भरताला सांगितलेला, पण गुरुदेवांनी गोड ओव्यांच्या रूपात शङ्कर रामायणात लिहिलेला हा उपदेश म्हणजे गुरुदेवांसारख्या राष्ट्रभक्ताच्या मनातील एका आदर्श राष्ट्र व्यवस्थेचे प्रतिबिंब आहे. आजच्या भारताला या परखड, तेजस्वी उपदेशाची आणि अशा सर्वच राज्यकर्त्यांची नितांत आवश्यकता आहे. सुदैव असे की भारताचे नेतृत्व आदरणीय मोदींच्या समर्थ हातात आहे!**

* * *

आजीव सभासद वर्गणी रु. २०००/- (१० वर्षांसाठी) आजच आदित्यदीपचे वर्गणीदार व्हा!

Subscribe to Aditya Pratishthan : YouTube

# जाग

– आदित्यव्रती नीलेश जालनावाला

जाग म्हणजे नक्की काय?

मी पहाटे उठलो म्हणजे मला जाग आली असं म्हटलं तर चालेल का?

पहाटे झुंजूमुंजू झाली, कोंबडा अरवला, पक्षांचे कूजन ऐकून झोप उडाली म्हणजे जाग आली असे म्हटले तर बरोबर आहे का?

भयानक स्वप्न पाहिले आणि दचकून जाग आली, हे ठीक आहे का?

एखाद्या सणासुदीच्या दिवशी सकाळी कानांवर रेडिओचे मंगल सूर पडून जाग आली म्हणजे आपल्याला जाग आली का? दिवाळीच्या पहिल्या दिवशी पहाटे फटाक्यांच्या आवाजाने जाग आली हे बरोबर आहे का?

मन विचारांनी अस्वस्थ झाले आणि जाग आली, तर ते बरोबर का? झोपेत घसा सुकला आणि तहान लागून जाग आली, बरोबर का?

घरातील खडबड खडबड किंवा कुकरची शिटी वाजून जाग आली असं म्हटलं तर चालेल?

एखाद्या जवळच्या माणसाने व्यवहारात किंवा नात्यात धोका दिला की आपण म्हणतो मला आता जाग आली. बरोबर का? लोकांनी ऐनवेळेस मदतीला नकार दिला की मग आपण म्हणतो जाग आली. बरोबर आहे का?

सकाळी उठायचे आहे. घड्याळाचा अलार्म वाजला आणि जाग आली. चालेल का?

मग या साऱ्या गोष्टींचे उत्तर जर ''नाही'' असं मी म्हटलं तर मग जाग कशाला म्हणायची? असा प्रश्न नक्कीच पडेल सर्वांना!

कुणी म्हणेल अर्धवट झोपेची स्थिती म्हणजे जाग पण हेही काही खरं नाही.

मी आज सकाळी हाच विचार करत उठलो. नक्की आपण जागे झालो म्हणजे काय? पण वरील सगळे संदर्भ मला मिथ्याच वाटले.

मग खरं उत्तर काय?

मला वाटतं जीवनात एखाद्या विशिष्ट ध्येयाप्रती ध्यास लागणं आणि ते ध्येय प्राप्त करण्यासाठी दिवस-रात्र एकत्रित करणं म्हणजे जाग होय!

अशी जाग स्वामी विवेकानंदांना आली होती आणि म्हणूनच स्वामीजी म्हणतात, ''उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत'' अर्थात् ''उठा, जागे व्हा आणि ध्येयाची प्राप्ती होईपर्यंत थांबू नका...!'' असा संदेश या भारत देशातील युवापिढीला स्वामीजींनी दिला.

दुसरं उदाहरण म्हणजे भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, सावरकर असे अनेक क्रांतीवीर ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात आपल्या प्राणांची आहुती दिली. त्या सगळ्यांच्या मनात देशाच्या स्वातंत्र्यलढ्याची जाग आली होती.

एखाद्या जाज्वल्य विचारांनी प्रेरित होऊन त्या लक्ष्याप्रती प्रयत्नांची पराकाष्ठा करणं म्हणजे खऱ्या अर्थाने जाग येणं असे मला वाटते.

आज आर्यन खानसारखे तरुण अंमली पदार्थांचं सेवन करून जेलमधून बाहेर आल्यावर, अनेक लोकं त्याच्या घरासमोर ढोल-ताशे वाजवून स्वागत करत आहेत.

किती दुर्दैव आहे हे!

खरंतर ही ढोल-ताशांची गर्दी नीरज चोप्रासारख्या ऑलिम्पिक सुवर्णपदकविजेत्या खेळाडूच्या स्वागतासाठी असायला पाहिजे होती. ज्याने क्रीडा क्षेत्रात संपूर्ण जगात आपल्या देशाची

मान उंचावली. पण ही प्रसारमाध्यमंसुद्धा चुकीच्या गोष्टींना अधिक खतपाणी देत असतात. त्यामुळे नको ते चुकीचे आदर्श लोकांच्या आणि भावी पिढीच्या समोर उभे राहतात.

आपली युवा पिढी आज कुठले आदर्श त्यांच्या डोळ्यांसमोर ठेवते आहे? त्यांना कधी खडबडून जाग येईल?

ह्या निद्रिस्त समाजाला वेळोवेळी जागं करण्याचं काम आपल्या थोर संतांनी आणि सत्पुरुषांनी केलेले आहे.

आपले गुरुदेव म्हणूनच आपल्यासमोर प्रभू श्रीराम, भगवान श्रीकृष्ण, छत्रपती शिवराय यांसारखे थोर आदर्श व त्यांचे चरित्र मांडतात. जेणे करून आपले अंतरंग कायमस्वरूपी जागे रहावे.


हे विचारधन पुढील पिढ्यांना देखील मिळावे म्हणून आदित्य प्रतिष्ठानची ग्रंथनिर्मिती. या सात्त्विक विचारांना कायमस्वरूपी अधिष्ठान प्राप्त व्हावे म्हणून 'संत विद्यापीठ' प्रकल्पाची निर्मिती.

आपल्या भाग्याने गुरुदेव शंकर अभ्यंकर हे असे सद्गुरू आपल्याला लाभले की त्यांनी निद्रिस्त, व्यस्त, त्रस्त अशा आपल्याला जागे केले. त्यांनी असे ग्रंथ लिहिले की आपल्याला खडबडून जाग यावी. गुरुदेवांनी लिहिलेला **'वन्दे मातरम्'** हा ग्रंथ असा आहे की प्रत्येक तरुणाने त्याची पारायणे करावीत. नुसती जाग येत नाही तर डोळ्यात अंजन घातले जाते असे गुरुदेवांचे विचार, आचार व उच्चार आहेत.


आता प्रत्येकाने विचार करा की आपल्याला रोज सकाळी 'जाग' कशाने येते? गुरुदेव नेहमी सांगतात, त्याप्रमाणे संत एकनाथांच्या 'जागल्या'-प्रमाणे आपण सर्वजण सदैव जागरूक असले पाहिजे!

आज सकाळी उठल्यावर माझ्या मनात हे सर्व विचार धावून आले आणि दिसामाजी काही लिहावे हे समर्थांचे वाचलेले बोल आठवले, म्हणून ते विचार लगोलग शब्दबद्ध केले. कारण विचारांचा गलबला कधी थांबत नाही. तो अखंड प्रवाहितच राहतो. हे विचार हरवू नयेत म्हणून आपल्यापर्यंत पोहोचवत आहे. हातून प्रतिष्ठानसाठी काहीतरी सत्कार्य घडू दे ही गुरुदेवांच्या चरणी प्रार्थना!

* * *






गुरुदेव
**शंकर अभ्यंकर**
लिखित
**वन्दे मातरम्**
(तिसरी आवृत्ती)




पृष्ठसंख्या
२० + ५१२ = ५३२ (सिंगल डेमी)
देणगी मूल्य रु. ४००/-
सवलत देणगी मूल्य रु. २८०/- मात्र


## आदित्य प्रतिष्ठानची समृद्ध वैचारिक संपदा




आवृत्ती १० वी




आवृत्ती ७ वी




आवृत्ती ११ वी

संपूर्ण सूची मागवा किंवा ग्रंथ / सीडी / पेनड्राईव्हज्‌साठी
पहा– www.adityapratishthan.org

## श्रीमद्‌ भागवत महायज्ञ



इंदोर येथे संपन्न झालेली आणि आता यू-ट्यूबवर
लक्षावधी भक्तजन श्रवण करत असलेली प्रवचनमाला

सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर आणि गुरुदेव शंकर अभ्यंकर यांच्या १९० ऑडिओ व्हिडिओसाठी
Aditya Pratishthan या यूट्यूब चॅनेलवर विनामूल्य Subscribe करा.

शुभ दीपावली!